# गणपतीचे पद

**गणाधिनाथा पवित्रगाथा माथा तव पदिं ठेवूं ।**
**चतुर्थीचा उत्सव करुनी दूर्वांकुर तुज वाहूं ।।धृ.।।**

सिंदुरचर्चितमस्तक सिंदुरदनुजारी तूं थोर ।
सर्व संकटे वारुनि विघ्नें स्मरता करिसी दूर ।।१।। गणाधिनाथा०

विद्यारंभी उत्सवकालीं जातां येतां नाम ।
मंगलधाम स्मरता तूझें मोरया पुरविसी काम ।।२।। गणाधिनाथा०

पाशांकुशरदवरदकरा तूं अससी जगतीं हेतू ।
स्मरता भक्तां गती देसि तूं तारक आमुचा तो तूं ।।३।। गणाधिनाथा०

लड्डुकमोदकभक्षणकारक शक्तिविधारक एक ।
तो तूं विनायक गजास्यतारक भाविकभयहारक ।।४।। गणाधिनाथा०

रक्तचंदनप्रसूनवसन प्रियदूर्वांकुर पूज्य ।
साज्य खाद्याच्या नैवेद्या घेऊनि सुख दे प्राज्य ।।५।। गणाधिनाथा०

***